**वादी तर्फे साक्षीदार क्र. ०१ शपथेवर कथन करतो:**

**उलट तपासणी**
( प्रतिवादी क्र. १ ते ४ साठी वकील श्री. आय. व्ही. रांजवण )

**०७.** माझे सासरे नामदेव यांना तीन मुले, माझे पती लक्ष्मण, नाना आणि श्रीराम हे होते. हे म्हणणे खरे आहे की, नाना आणि श्रीराम हे मयत आहेत. माझ्या पतीने गट क्र. ५३८ मध्ये १ एकर ८ गुंठे शेतजमीन खरेदी केली. माझ्या पतीने अलकाला शेतजमीन कोणत्या तारखेला घेतली, ते मी सांगू शकत नाही. अलका ही माझी लहान बहीण आहे. ती परांडा तालूक्यातील देवगाव येथे राहाते. मी अलकाकडून तीच जमीन किती तारखेला खरेदी केली, ते मला आठवत नाही. सदर खरेदीचा ठराव खरेदीच्या किती दिवसापूर्वी आणि कोणत्या तारखेला झाला, हे मी सांगू शकत नाही. माझ्या सास—याला दोन मुली गोदाबाई आणि अक्काबाई या आहेत.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, तारामती यांच्या मुलांनी माझे पती आणि त्यांच्या बहिणी यांच्या विरुद्ध वाटपाचा दावा दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याचा निकाल झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये गट क्र. ५३८ मधील शेतजमिनी तिन्ही भाउ आणि दोन बहिणी यांनी वाटप करुन देण्याचा हुकुमनामा झालेला आहे. मला याची माहिती नाही की, सदर हुकुमनाम्याविरुद्ध माझ्या पतीने आणि ईतरांनी अपिल केले होते का आणि ते नामंजूर झाले का.

**०९.** हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ५३८ मधील शेतजमीन माझ्या सास—याने तारामती आणि तिच्या मुलांना वाटप करुन दिलेले

होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाटपापासून सदर शेतजमिनीवर तारामतीचा ताबा राहात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेतजमीन तारामती आणि तिच्या मुलांना मिळू नये म्हणून आम्ही खोटी खरेदीखते तयार करुन घेतलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते आहे ते दोन्ही खरेदीखते ही कोणत्याही मोबदल्याशिवाय तयार करण्यात आली. मी दावा मिळकतीच्या चतु:सीमा सांगू शकते. पूर्वेला—गिराम यांची शेतजमीन, पश्चिमेला—खराडे यांची शेतजमीन, तिस—या बाजुला सातपुते याची शेतजमीन तर चौथ्या बाजुला नदी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्हा सर्वांच्या नावाच्या नोंदी बेकायदेशीर खरेदीखताआधारे आणि बेकायदेशीरपणे झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींना वाटप होवून मिळालेली शेतजमीन त्यांना मिळू नये म्हणून मी खोटा दिलेला आहे आणि त्याचे खोटे समर्थन करीत आहे.

**फेर तपासणी—** निरंक.

दिनांक: १६.०९.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरित/—

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.